पोलीस उप अधीक्षक कार्यालय ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद ★ सत्यमेव जयते

दिनांक ०१/०२/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**१) महिला आरोपी लोकसेवक श्रीमती कांचन हरिश्चंद्र शेळके, वय ४५ वर्षे, पद-महिला पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस स्टेशन विरगांव, औरंगाबाद ग्रामीण, २) श्री गणेश परसराम तोगे, वय ३३ वर्ष पद - पोलीस पाटील, वक्ती, ता. वैजापुर, जिल्हा औरंगाबाद यांनी लाचेची मागणी करून ३,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १) महिला आरोपी लोकसेवक श्रीमती कांचन हरिश्चंद्र शेळके, वय ४५ वर्षे, पद-महिला पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस स्टेशन विरगांव, औरंगाबाद ग्रामीण,<br>२) श्री गणेश परसराम तोगे, वय ३३ वर्ष पद - पोलीस पाटील, वक्ती, ता. वैजापुर, जिल्हा औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे विरगांव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ३,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना देशी दारु विक्री सुरळीत चालु ठेवण्याकरीता दरमहा हप्ताची मागणी करणेसाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | महालगांव फाटयावर रोडवर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने देशी दारुची विक्री करतात. तक्रारदार यांच्याकडे देशी दारु विक्री व्यवसाय सुरळीत चालु ठेवण्याकरीता व कारवाई न करणे करीता श्रीमती शेळके, महिला पोलीस हवालदार, गणेश तोगे, पोलीस पाटील यांनी ३,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, श्रीमती कांचन शेळके, महिला पोलीस हवालदार व गणेश तोगे, वत्की, पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे ३,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, इलोसे गणेश परसराम तोगे वय ३३ वर्षे, पद-पोलीस पाटील, वक्ती, ता. वैजापुर, जि.औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन ३,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर वरील दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे विरगांव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार रविंद्र अंबेकर, गोपाल बरंडवाल, राजेंद्र सिनकर, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :**-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

01/02/2021

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.